**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.४८४/२०२३**

MHBU150008732023

**महाराष्ट्र सरकार(पो.स्टे- अंढेरा) विरुध्द मुकिंदा सुरेश साळवे**

**न्यायनिर्णय**
**(दिनांक : ११/०३/२०२६ रोजी घोषीत)**

१. अभिलेखावर असलेल्या पुराव्यावरुन खालील वादप्रश्न माझ्या निर्णयार्थ उपस्थित होतात.

| अ.क्र. | वादप्रश्न | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | दि.०४/१०/२०२३ रोजी १९.२६ वाजता मौजे धोत्रा , ता. देऊळगावराजा, जि. बुलडाणा येथे आरोपी त्याच्या ताब्यात बेकायदेशीररीत्या ५ लि. हातभट्टी दारु बाळगताना मिळून आला काय हे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | : | **नकारार्थी.** |
| २. | आदेश काय ? | : | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.** |

**कारणमिमांसा**

२. अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी **साक्षीदार क्र.१ दगडुबा तुकाराम तेजनकर** (पंच) व **साक्षीदार क्र.२ मोरसिंग देवसिंग राठोड** (फिर्यादी तथा तपास अधिकारी) यांची साक्ष नोंदविलेली आहे. त्याशिवाय अभियोग पक्ष अनुक्रमे **नि.क्र. १० व ११ तोंडी रिपोर्ट व प्रथम खबर अहवाल, घटनास्थळ पंचनामा नि.क्र. १३, रासायनिक विश्लेषणाचा अहवालाकरीता पाठविलेले पत्र निशाणी-१४** या कागदोपत्री पुराव्यावर विसंबुन आहे.

३. अभियोग पक्षाच्या साक्षीचे अवलोकन केले असता आरोपीविरुध्द गुन्हासदृश्य तथ्य मिळून आल्याने आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वयेचा जबाब नोंदविण्यात आला. आरोपीतर्फे बचावा पृष्ठ्यर्थ कोणताही पुरावा सादर करण्यात आलेला

नाही.

४. अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता व आरोपीतर्फे वकील यांचा युक्तीवाद श्रवण केला.

<u>वादप्रश्न क्र.१ करीता</u> :-

५. अभियोग पक्षाने केलेले आरोप सिध्द करण्यासाठी आद्य जबाबदारी अभियोग पक्षाची असते. आपल्याकडे उपलब्ध असलेल्या पुराव्यातुन आरोपीवर केलेले आरोप सिध्द करणे अभियोग पक्षाचे साद्य असते. आरोप सिध्द करणे म्हणजे त्या त्या गुन्ह्याचे आवश्यक घटक प्रस्थापित करणारे तथ्य पुराव्यातुन सिध्द करणे होय. अशा पुराव्याची सांगड घालताना अभियोग पक्षाला सर्वतोपरी काळजी घ्यावी लागते की, अशा पुराव्याच्या सादरीकरणातुन कोणताही वाजवी संशय निर्माण होणार नाही किंवा पुराव्यावर विश्वास ठेऊ नये अशी परिस्थिती उदभवणार नाही. पुराव्याचे निरीक्षण करताना हे लक्षात ठेवावे लागते की, जर निमार्ण होणारा संशय वाजवी असेल तर तो निश्चितच बचाव पक्षाला मदत करतो म्हणुन उपलब्ध पुराव्याचे बारकाईने परिनिरीक्षण होणे आवश्यक आहे.

६. आरोपी विरोधात आरोप केलेला गुन्हा सिध्द करण्यासाठी या चौकशीत अभियोग पक्षाला हे प्रस्थापित करावयाचे होते की, आरोपी हा अवैद्यरित्या ५ लि हातभट्टी दारु व इतर साहित्य बाळगताना मिळून आला.

७. **साक्षीदार क्र.१ दगडुबा तुकाराम तेजनकर** (पंच), यांनी त्यांच्या साक्षीमध्ये अभियोग पक्षाच्या कथनास पृष्टी देणारे कथन केलेले नसुन त्यांनी त्यांच्या जबाबात पंचनाम्याबाबत कुठलेही महत्वाचे विधान केले नाही. सदरील पंच साक्षीदार हा त्यांच्या पुर्वीच्या जबाबास मुखर झाल्याने त्यांना उलट तपासाप्रमाणे प्रश्न विचारण्याची परवानगी सरकारी अभियोक्ताद्वारे मागण्यात आली. परवानगी दिली असता सदरील साक्षीदारांनी त्यांना विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे नकारार्थी दिली आहेत.

८. **साक्षीदार क्र.२ मोरसिंग देवसिंग राठोड (फिर्यादी तथा तपास अधिकारी)** यांच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, घटना हि दि. ०४/१०/२०२३ रोजी घडली होतीत्यादिवशी त्यांना गुप्त बातमीद्वारे माहिती मिळाली की, आरोपी धोत्रा या गावामध्ये हातभट्टी दारु बाळगुन त्याची विक्री करीत आहे. त्यानुसार ते पंचाची व त्यांची खात्री झाल्याने आरोपीवर प्रोहिबीशन रेड केला असता आरोपीकडुन ५ लिटर हातभट्टी दारु एका कॅनमध्ये मिळुन आली. मिळालेल्या जप्त मुद्देमालापैकी १५० एम.एल. दारु एका शिशीमध्ये रासायनिक विश्लेषणासाठी राखुन ठेवण्यात आली व त्यावर पंचाच्या व त्यांच्या सहीचे लेबल लावण्यात आले व उर्वरीत मुद्देमाल घटनास्थळी नाश केला. पोलिस स्टेशनला येऊन फिर्याद दाखल केलीत्यांनी घटनेची लेखी रिपोर्ट दाखल, प्रथम खबर अहवाल, घटनास्थळ

पंचनामा व रासायनिक विशलेषणासाठी पाठविलेले पत्र त्यांने ओळखले. त्यावर त्यांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. ते अनुक्रमे नि.क्र. १०/अ.सा.२, नि.क्र. ११/अ.सा.२, नि.क्र. १२/अ.सा.२ व नि.क्र. १३/अ.सा.२ वर आहे. आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने दोषारोप पत्र न्यायालयात दाखल केले. तसेच ते आरोपी ओळखतात. त्यानंतर तपासांती आरोपीविरुध्द गुन्हासदृश्य तथ्य मिळुन आल्याने आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

९. अभियोग पक्षाच्या खटल्यानुसार आरोपीच्या ताब्यातुन देशी दारु व इतर साहित्य जप्त केली आहेत. सदर बाब तपासी अधिकारी व फिर्यादी यांनी कथन केली असली तरी सदरील वरील नमुद रसायन ज्या स्वतंत्र पंच साक्षीदारांसमोर जप्त करुन पंचनामा तयार करण्यात आला आहे, त्यातील पंच साक्षीदार याने अभियोग पक्षास पुरक कथन केलेले नाही त्यामुळे जरी नि.क्र. १३ अन्वये पंचनामा केल्याचे नमुद केले असलेतरी तरी परिपोषक पुराव्या अभावी पंचनामा पुर्णपणे शाबीत झाला असे निष्कर्ष काढणे विधीग्राह्य होणार नाही. त्यामुळे, जप्त केलेला मुद्देमाल हा आरोपीच्याच ताब्यातुन जप्त केला आहे किंवा कसे त्याचप्रमाणे आरोपीचा व मुद्देमालाचा संबंध असल्याची बाब अभियोग पक्ष शाबीत करण्यास असमर्थ ठरले आहे. त्याचप्रमाणे, अशी जप्ती झाली होती असे गृहीत धरले तरी ती मोहोरबंद बाटली रासायनिक विश्लेषणासाठी पाठविली होती हे दर्शविण्यासाठी संबंधित वाहकाचा पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. तसेच मुख्यत: फिर्यादी यांची साक्ष नोंदविण्यात आलेली नाही. त्यामुळे फिर्यादसुध्दा शाबीत झालेली नाही. तसेच रासायनिक विश्लेषनाचा अहवालसुध्दा दाखल नाही. त्यामुळे पुराव्यांची साखळी सादर करताना अभियोग पक्षाला अपयश आले आहे हे स्पष्ट होते.

१०. या उपरोक्त दप्तरी आलेला पुरावा जरी जशास तसा ग्राह्य मानला तरी त्यांचा पुरावा आरोपीस गुन्ह्याशी जोडण्यास पुरेसा नाही. आरोपीच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, रासायनिक विश्लेषणाचा अहवाल दाखल केला नाही, त्यामुळे जप्त केलेला मुद्देमाल देशी दारु होती हे सिध्द झालेले नाही. सदर युक्तीवादाच्या अनुषंगाने संचिकेचे अवलोकन केले असता जप्त मुद्देमालापैकी १८० मिली ही एक बाटली रासायनिक विश्लेषणासाठी पाठवली होती, परंतु त्याचा अहवाल अभिलेखावर दाखल करण्यात आलेला नाही. त्यामुळे आरोपीच्या ताब्यात कथित देशी दारु मिळून आली याबाबतचा कोणताही पुरावा अभियोग पक्ष देण्यास असमर्थ ठरले आहे. त्याचप्रमाणे तपासी अधिकारी यांनी जरी जप्ती पंचनामा शाबीत केलेला असेल परंतु अभियोग पक्षाने सदरील पंचनाम्यावरील तपासलेले पंच यांनी अभियोग पक्षास पुरक असे विधान न केल्याने सदरील जप्ती पंचनामा पुर्णपणे शाबीत झाल्याचे निष्कर्ष काढणे विधीग्राह्या होणार नसल्याने सदरील हातभट्टी दारु आरोपीच्याच ताब्यातून जप्त केलेले आहे हे देखील अभियोग पक्ष शाबीत करण्यास असमर्थ ठरला आहे. त्यामुळे पुराव्यांची साखळी सादर करताना अभियोग पक्षाला अपयश आले आहे हे स्पष्ट होते.

११. वरील सर्व बाबींचा विचार करता हे स्पष्ट होते की, दारु बंदी अधिनियमाच्या संबंधित कलमानुसार दंडनीय गुन्हा या आरोपीने केले हे प्रस्थापित करण्यास अभियोग पक्षाला अपयश आलेले आहे. म्हणजेच यापुर्वी उल्लेख केल्याप्रमाणे आवश्यक घटक सिध्द करण्यात किंवा त्याचे अस्तित्व प्रस्थापित करण्यात अभियोग पक्षाला पुर्णतः अपयश आले आहे हे स्पष्ट होते. त्यामुळे मी **वादप्रश्न क्र.१** चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**वादप्रश्न क्र.२ करीता :-**

१२. **वादप्रश्न क्र.१** च्या नकारार्थी निष्कर्षाअंती मी **वादप्रश्न क्र.२** च्या निष्कर्षा दाखल पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

| **आदेश** | |
|---|---|
| १) | आरोपी नामे - **मुकिंदा सुरेश साळवे** यांची फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५(१) नुसार मुंबई (महाराष्ट्र) दारुबंदी कायद्याच्या कलम ६५(ई) प्रमाणे शिक्षेस पात्र असलेल्या अपराधातून मुक्तता करण्यात येते. |
| २) | आरोपीचे जामीनपत्र व बंधपत्र रद्द करण्यात येत आहे. |
| ३) | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ४३७(अ) अन्वये रक्कम रु.१५,०००/- चे वैयक्तीक बंधपत्र व जामीनपत्र द्यावे. सदर बंधपत्र पुढील सहा महिन्यांच्या कालावधीसाठी अस्तित्वात राहतील. |
| ४) | मुद्देमाल ५ लि. हातभट्टी दारु तो पोलीसांनी अगर राज्य उत्पादन शुल्क, बुलडाणा विभागाने अपिल कालावधीनंतर रितसर नाश करावा. |
| (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित) | |

स्वा/-
**(श्री. एच.एम.बेग )**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कोर्ट क्र.२,
देऊळगावराजा.

दिनांक :११/०३/२०२६.

**Certificate :**

I affirm that, the contents of this PDF File are same words for words, as per the original Order.

Name of Clerk : S.N. Adhao
Name of the Court : Civil Judge Jr.Dn. & J.M.F.C. Deulgaon Raja.
Date of upload : 12/03/2026